Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

VOL- VIII ISSUE- VI JUNE 2021 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.149 ISSN 2349-638x

# बालसाहित्यीक एकनाथ आव्हाड यांच्या लेखनावर एक प्रकाश

संशोधक विद्यार्थी
श्री शिवराज ग्यानदेवराव गुट्टे
(M.A MARATHI)
email: shivrajgutte19@gmail.com

**प्रास्ताविक**

बालसाहित्यिक एकनाथ आव्हाड यांनी बालकांच्या अंतरंगाचा शोध घेत बालकवितांचे लेखन केले असून यशाचे उंच उंच शिखर गाठण्यासाठी बालकांना गगनभरारी घेता यावी म्हणून प्रतिभेचे पंख मुलांना देऊ केले आहेत, असे त्यांची कविता वाचल्यानंतर मला वाटते. एकनाथ आव्हाड यांचे बालसाहित्यात मोठे योगदान असून त्यांचे बालकविता संग्रह, काव्यकोडी संग्रह प्रसिद्ध आहेत. महाराष्ट्र शासनाच्या बालसाहित्य पुरस्कारासह इतरही साहित्य संस्थांचे पुरस्कार त्यांना मिळाले आहेत.

'श्री. आव्हाड यांच्या मते, लहान मुलांना खूप प्रश्न पडतात. त्या मुलांच्या प्रश्नांची उत्तरे देणे गरजेचे आहे. खरे तर मोठ्यांनी मुलांच्या प्रश्नाचे उत्तर पाठवून द्यायला हवं. तसेच साहित्यासाठी बाह्य अंगापेक्षा अंतरंग खूप महत्वाचे असते. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना पुस्तकांशी मैत्री करा, नातं निर्माण करा, असं सांगत बालकविता सादर केल्या. या वेळी विद्यार्थ्यांनी त्यांच्या कवितांना मोठा प्रतिसाद मिळाला.

बालसाहित्यिक एकनाथ आव्हाड यांनी बालकुमार वाचकांसाठी 'मिसाईल मॅन डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम' हे अतिशय वाचनीय असे गोष्टीरूप चरित्र लिहिले आहे. महापुरुषाचे चरित्र म्हटले की, कालानुक्रमाने लिहिलेला जीवन इतिहास ही चरित्रविषयक पारंपरिक समजूत, पण आव्हाडांनी चरित्रलेखनाची ही परंपरागत चौकट मोडून छोट्या छोट्या चार भागांतून कलामसरांच्या जीवनगोष्टी सांगितल्या आहेत.

**1.1 एकनाथ आव्हाड यांचे प्रसिद्ध बालसाहित्यक लिखाण :**

- **काव्यकोडी संग्रह**
- आनंदाची बाग • एकदा काय झालं
- जरा ऐकून तर घ्या थेंबे थेंबे तळे साचे
- **अन्य बालसाहित्य खंड**

१ ते ५ (कथा कवितांचा समावेश). बालगीत लेखन

- **नाट्यछटा संग्रह**

मला उंच उडू दे

**1.2 संशोधनाचे उद्दिष्टे :**

1) बालसाहित्यामधून मुलांना मानसिकदृष्ट्या निरोगी आणि कल्पक बनवणे.
2) बालसाहित्यामधुन मुलांचा व्यक्तिमत्त्व विकास साधणे.
3) मुलांमध्ये बालसाहित्य विषयक अभिरुची निर्माण करणे.
4) तंत्रस्नेही मुलांना वाचनाकडे वळवणे.

**1.3 संशोधन विषयाचे गृहितके :**

1) बालसाहित्याचे मुलांच्या जीवनातील महत्व पटवून देणे.
2) तांत्रिकीकरणामुळे बालसाहित्यापासून दूर झालेल्या मुलांच्या मनाचा शोध घेणे.

3) मुलांच्या आयुष्यामध्ये सर्वांगीण विकासासाठी बालसाहित्य समर्थ आहे का हे स्पष्ट करणे.

4) मुलांचे भावविश्व बालसाहित्यातून समृध्द करणे.

**1.3 संशोधन पद्धती** :

सदरील संशोधनासाठी वर्णनात्मक सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे.

**निष्कर्ष :**

1) बालसाहित्यामध्ये बाह्य अंगापेक्षा अंतरंगाला खूप महत्व आहे.
2) बालसाहित्यामुळे भावी पिढी मानसिकदृष्ट्या निरोगी व कल्पक घडेल.
3) बालसाहित्यामुळे मुलांच्या कल्पनाशक्तीचा विस्तार होण्यास मदत होते.

**1.4 संदर्भ :**

1) ग.वी. अकोलकर बालवाड्मय : स्वरूप, प्रेरणा आणि प्रसार, 'गोकुळ', बालकुमार साहित्यविषयक विशेषांक जुलै १९७१.
2) गोपीनाथ तळवलकर, बालकुमार साहित्य संमेलन, अध्यक्षीय भाषण, १९७६.
3) मालतीबाई दांडेकर, मराठी बालकुमार साहित्य संमेलन, स्मरणिका, अध्यक्षीय भाषण, १९७६.
4) मालती दांडेकर, 'बालसाहित्याची रूपरेषा', मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, १९६४, पृ. १०.
5) वा. ल. कुलकर्णी, 'वाङमयीन मते आणि मतभेद', ढवळे, १९४९, पृ. ६६.
6) अशोक बागवे, 'आलोचना 'बालविशेषांक, अंक -४, डिसेंबर १९७९, पृ. ६५.
7) रत्नाकर मतकरी, अध्यक्षीय भाषण, पंधरावे बालकुमार साहित्य संमेलन, पुणे, 'सकाळ', दि. २६-१२-२००१, पृ. १.
8) कुलश्रेष्ठ एम (२०१४) : 'पंचकन्या' 9788171382941 राजकमल प्रकाशन.
9) कांकरिया. एम. (२०१२) : पत्ता खोर 9788126722433. राजकमल प्रकाशन.
10) डॉ.त्रिपाठी ए. स. : उत्तर सती के उपण्यासो में स्त्री.